# पाऊस गाणी..



शैलेश हिंदळेकर



# पाऊसगाणी

पावसाळा  जवळ  आला, की
लेखणीला  पान्हा फुटतो.  या ऋतूच्या
वेगवेगळ्या छटांवर वेगवेगळ्या
ओळी आपसूक उमटतात.
मी यापूर्वीच  लिहिलेल्या निवडक
बारा पाऊसगाण्यांच्या होड्या अलगद
सोडतोय. घ्या फेरफटका मारून.



# पाऊसगाणी

उन्हाळ्याची  काहीली केवळ आगामी पावसाची आठवण  काढत, वाट पाहत सहन केली जाते. कॅलेंडरवर पावसाचा महिना लागला, मान्सूनच्या बातम्या कानावर आल्या, कि मनात पावसाचे वेध  लागतात.
मग कोरड्या आकाशात पाहून देवाला साकडं घातलं  जातं.



# दे पाऊस देवा...

सूर्य तेजाचा महिना
आतां सरला रे देवा
यावं भरून आभाळ
मेघ सावळा सांडावा
झाली घायाळ धरणी
तप्त किरणे झेलून
भेगाळलं अंग अंग
गेला झाडोरा सुकून
जीव सारे न्याहाळती
आज वाट पावसाची
फौज येऊदे नभात
काळ्या सावळ्या ढगांची
बंधमुक्त झिरपूदे
माळ अमृत थेंबांची
गार हिरवी होऊदे
शाल धरती मातेची

शैलेश हिंदळेकर



शैलेश हिंदळेकर 9870547118



# पाऊसगाणी

येणा-या पाहुण्याला आपण जशी वाट सांगतो, तशी सोपी वाट सांगितली जाते. वाटेतल्या अडचणी सांगितल्या जातात.

# असा ये पावसा ..

ये जरा चालून तू
उतरून डोंगर बोडका
डावलुनी ये परिसर
तो नदीचा कोरडा
चार विहिरी गाळ भरल्या
लागती वाटेत रे
ओंडके ओलांडुनी ये
टाकलेले आडवे
गांवच्या वेशीवरी
अन केर आहे साचला
तो ही ये दुर्लक्षुनी तू
श्वास रोखुन आपला
बरसण्या गांवांत माझ्या
आज ये रे पावसा
एवढा सोपाच आहे
मार्ग माझ्या गांवचां

शैलेश हिंदळेकर

शैलेश हिंदळेकर ९८७०९४७९९८





# पाऊसगाणी

मग काही दिवस, पावसाच्या हुलाकावण्या सुरु होतात. आला आला म्हणताना पुन्हा आकाश कोरडं होतं. नैराश्य येतं.

# आभाळ कठोर झाले...

आभाळ का कळेना
इतके कठोर झाले
सारेच मेघ काळे
झटकून शांत झाले
काळी छटा जराशी
येताच आसमंती
वारे उनाड आले
पुसुनी पसार झाले
आशाळभूत सारे
गगनी खिळून डोळे
पण थेंब पावसाचे
अगदी महाग झाले

शैलेश हिंदळेकर

शैलेश हिंदळेकर ९८७०५४७९९८





# पाऊसगाणी

काळे ढग फुंकून घालवणा-या
वा-याला विनवणी केली जाते,
दटावले जाते

# वाऱ्या...

वाऱ्या जरा ढगांना
घेऊन ये पुन्हा
त्यांना विचार आता
केला कुणी गुन्हा

जोशात तूच सारे
आकाश झाडले
ते कृष्ण मेघ सारे
तू दूर धाडले

धरणी तहानलेली
आवासुनी उभी
कण नाही पावसाचा
साऱ्या निळ्या नभी

समजावुनी कसेही
पाऊस आण तू
दुष्काळ संकटाचे
गांभिर्य जाण तू

शैलेश हिंदळेकर

शैलेश हिंदळेकर ९८७००५४७९९८



# पाऊसगाणी


हा हुलाकावणी देणारा पाऊस
गृहिणींची सुद्धा दमछाक करतो.
अंगणात टाकलेलं वाळवण, वाळत
टाकलेले कपडे धावपळ करून गोळा
केले जातात आणि पुन्हा उन्ह पडतं.



# फसवून पांगले

किरकोळ पुंजके ते
काळ्या भु-या ढगांचे
आताच या दुपारी
अवचित पाहिले
    परसात वाळण्याला
    झटकून टाकलेले
    कपडे पटापटा मी
    मग आत आणले
हलकेच पापडाचे
अन् ताट सांडग्याचे
ओट्यावरून तेव्हा
आवरून ठेवले
    बरसेल मेघमाला
    धो धो आता क्षणात
    मी उगीच गारव्याचे
    अंदाज बांधले
पळ एक एक गेला
पाऊस अंगणी या
खेळेल तो म्हणुनी
आवरून ठेवले
    का आजही तसेच
    ते मेघ दुष्ट झाले
    वा-यासवे क्षणात
    फसवून पांगले

....शैलेश हिंदळेकर





# पाऊसगाणी

तर तिकडे एखादा रुसलेला कवी,
जोवर पाऊस पडत नाही, तोवर,
पावसावर कविता न करण्याची  धमकी
देतो.

# पाऊस कविता ???

बेडकांचे गीत या
कानांवरी पडलेच नाही
काजव्यांचे पुंजके अजुनी
कुठे दिसलेच नाही
गार शिंतोडे मुखावर
आजही पडलेच नाही
शेत, अंगण,गाव माझे
आजही भिजलेच नाही
रंग करडा सावळा
गगनावरी टिकलाच नाही
दावले ढग मोजके
पाऊस पण आलाच नाही
चिंब ओलेता असा मी
जोवरी भिजणार नाही
पावसाच्या कौतुकाचे
शब्द मी विणणार नाही




.....शैलेश हिंदळेकर



# पाऊसगाणी

असं होता होता, एकदाचा पाऊस सुरु होतो. मात्र वाट पाहणारे लगेचच छत्री उघडून त्याला घाबरवतात. चिंब भिजून त्याचं स्वागत करावं....



# तो आला...

तो आला, आला,
गरजत उधळत
थेंब फुलांच्या माला
उघडून आपल्या
छत्र्या आतां
नका परतवू त्याला.
जा भिजा, होऊनी
धमाल धूम्मड
थेंब टप्पोरे झेला
कोरडे आतां ना
कुणी रहावे
आला पाऊस आला


शैलेश हिंदळेकर

शैलेश हिंदळेकर 9870547118



# पाऊसगाणी


पाऊस  गारवा अंगाला शिवला
की  अवघ्या प्रेम पाखरांच्या भावना
उत्तेजित होतात. कल्पना कागदी
विमानासारखी भिरभिरत उंच ढगाला
जाऊन शिवते.
त्याला वाटतं, तिने प्रेमाने धाडला, ...
हा पाऊस.
तो म्हणतो....


तू पाठवलेला पाऊस मिळाला...
वारे भरारा बावरे,
भुरभुर वाहू लागले.
काळ्या ढगांना लेवूनी,
आभाळ मग झाकोळले.
मी गंध ओल्या मातीचा,
हुंगून अवचित ताडले.
हे थेंब तू सखयेच गं,
गावांत माझ्या धाडले.
थोडे जरि कितिदा तुला,
जेव्हा कधीही लाभले.
चतकोर सुख माझ्याकरिता,
वेगळे तू काढले.
.......शैलेश हिंदळेकर



# पाऊसगाणी

पण तिच्या गावात असेल का पाऊस? त्याला चिंता वाटते. मग तोही आपल्याकडचा थोडा पाऊस आपल्या कल्पनेचे पंख जोडून, तिच्याकडे पाठवतो...


भेट...
घन पाऊस साठवलेले
राशींसह थेबांच्या
वारेही अवखळ ओले
गंधासह मातीच्या
मी सर्व बांधले होते
धाग्याने प्रेमाच्या
धाडले लगोलग होते
गावात सखे तुमच्या
पोहोचली भेट तेथे का
बरसले प्रेम माझे
मज धाड निरोप त्वरेने
भिजले का गांव तुझे ?
शैलेश हिंदळेकर
शैलेश हिंदळेकर 9870547118



# पाऊसगाणी


पाऊस  म्हणजे गारवा.. पाऊस म्हणजे आनंद...पावसाची पाऊले सृष्टीला सुखावतात.


पावसाची पाऊले....
घेऊनी घट अमृताचे
मेघ करडे थांबले
अंगणी उतरून आली
पावसाची पाऊले
गंध ओल्या मृत्तीकेने
चित्त हे वेडावले
अंगणी उतरून आली
पावसाची पाऊले
परसदारी बेडकांचे
गोड गाणे वाजले
अंगणी उतरून आली
पावसाची पाऊले
मिट्ट अंधारातूनी ते
काजवे मिचकावले
अंगणी उतरून आली
पावसाची पाऊले
...............शैलेश हिंदळेकर
शैलेश हिंदळेकर 9870547118



# पाऊसगाणी

वर्षभर अपेक्षित असलेला बिचारा पाऊस, जमिनीवर कोसळताना अनेकदा उपेक्षित होतो. त्याला त्याच्या कामाचं  सार्थक झाल्यासारखं  वाटत नाही. त्याने वाहून आलेले जलमोती अनेक ठिकाणी व्यर्थ जातात, वाया जातात.



# " वेडा पाऊस "

धरणीवर धुवाधार
जेव्हा तो सांडतो
थेंब वाटताना
ना  रंक, राव पाहतो
वाटत सुटतो वेडा
थेंब थेंब आपले
साठवतो कोण कसे
हे ही ना पाहतो
कोण तया अडवतो
शेतातून जीरवतो
तळी, हौद, विहिरीतून,
प्रेमाने मुरवितो
कोण पहातो नुसता
आला आला म्हणतो
पाऊस सारा सारा
सागरात वाहतो

..............शैलेश हिंदळेकर



# पाऊसगाणी

हे वाहून जाणारं पाऊसबीज,
पुन्हा पेरायला  हवं. कसं ?



# पाऊस पुन्हा पेरावा....

कोषातून आभाळाच्या
धरतीवर कोसळणारे
डोंगर माथ्याला शिवूनी
झर झर खाली येणारे
झाडांवर आदळणारे
फांद्यांवर बागडणारे
पानांच्या अंगावरुनी
टप टप खाली पडणारे
रुजतात थेंब पाण्याचे
किती सांगा धरतीवरती ?
जातात किती जलबिंदु
सागरात होण्या भरती ?
थेबं थेंब तो पडणारा
धरणीवरती येणारा
कधी व्यर्थ न जाऊ द्यावा
हळुवार जपून ठेवावा
जपलेल्या या थेंबांचा
उपयोग जगाला व्हावा
हा असाच रे मित्रांनो
पाऊस पुन्हा पेरावा


............शैलेश हिंदळेकर ©

शैलेश हिंदळेकर



# पाऊसगाणी

प्रत्यक्ष पुस्तक छापायला हवा तसा निवांतपणा सापडला नाही अद्याप. तोवर हे लहानसं ई बुक गोड मानून घ्या. माझ्या इतर कविता माझ्या फेसबुक प्रोफाइल वर उपलब्ध आहेत. आपले अभिप्राय माझ्यासाठी लाख मोलाचे आहेत. त्याकरिता माझा व्हाट्सअप क्रमांक ९८७०५४७११८. धन्यवाद 🙏



# पाऊसगाणी

हे पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान कवी व छायाचित्रकार श्री. शैलेश हिंदळेकर यांचे मनःपुर्वक आभारी आहे.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण श्री शैलेश हिंदळेकर यांना ९८७०५४७११८ या क्रमांकावर कळवाव्या ही विनंती.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237
(Whatsappवर विनामूल्य ई पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)